# लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## आचार्य पदवी संशोधन केंद्र (इतिहास विभाग)

# संशोधन पद्धती शास्त्र - वस्तुनिष्ठ प्रश्न

❖ ज्ञान प्राप्त करण्याच्या वैज्ञानिक पद्धतीचे नाव काय ? **- संशोधन**

❖ एखाद्या विषयाचे व्यवस्थाबद्ध ज्ञान समुच्चय म्हणजे काय ? **- शास्त्र**

❖ 'शास्त्र किंवा विज्ञान हा केवळ ज्ञानसंग्रह नसुन ती एक पद्धत आहे' ही व्याख्या ? **विशेंज आणि विशेंज**

❖ अनुभवप्रामाण्य, सापेक्ष संकल्पनांचा उपयोग, वस्तुनिष्ठतेवरील श्रद्धा, नैतिक तटस्थता, सामान्यीकरण, भविष्यकथन, प्रकटीकरण ही कशाची मूलभूत तत्त्वे आहेत ? **संशोधनाची शास्त्रीय पद्धती**

❖ निष्कर्षाच्या स्पष्टीकरणाला काय म्हणतात ? **निर्वचन किंवा संशोधन भाष्य**

❖ निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, अनुसूचीचे कार्य काय आहे? **तथ्यसंकलन**

❖ संशोधन कार्यातील कारण आणि परिणाम व्यक्त करणारे विधान म्हणजे काय ? **गृहितकृत्य**

❖ संशोधन कार्याचे नियोजन म्हणजे काय ? **संशोधन आराखडा**

❖ सामाजिक घटना व समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेल्या क्रमबद्ध व्यवस्थित अभ्यासपूर्ण विश्लेषणाला सामाजिक संशोधन म्हणतात ही व्याख्या कोणाची ? **मोझर**

❖ सामाजिक संशोधनाचे प्रथम चरण कोणते ? **समस्यांची निवड**

❖ ज्ञानाचा विकास, शास्त्रीय अभ्यास, मानवतेचे कल्याण, तथ्यांचे वर्गीकरण, सामाजिक नियंत्रण आणि अनुमान व कार्यकारण संबंधाचा शोध हे कशाचे उद्देश आहेत.? **सामाजिक संशोधन**

❖ विषयाचे ज्ञान, संशोधन पद्धतीचे ज्ञान, व्यक्तिगत रूची, निःसक्षता व सकारात अनुभव हे कशाचे निकष आहेत ? **आदर्श संशोधकाचे विशिष्ट गुण**

❖ सामाजिक संशोधनाचा केंद्रबिंदु कोणता ? **मानव/मनुष्य**

❖ भौतिक शास्त्रातील संशोधनाचा केंद्रबिंदु कोणता ? **नैसर्गिक घटक**

❖ कोणत्या शास्त्रातील संशोधनासाठी प्रयोगशाळा अपेक्षित नाही ? **सामाजिक शास्त्र**

❖ अचुकता, पडताळणी व वस्तुनिष्ठता ही कशाची वैशिष्ट्ये आहेत ? **संशोधन कार्य**

❖ मानवी व्यवहाराशी संबंधित सामाजिक संशोधनात कोणते प्रकार स्वीकारणे कठीण आहे ? **वस्तुनिष्ठ संशोधन कार्य**

❖ वस्तुनिष्ठता म्हणजे तथ्यांचे निष्पक्षपणे व तटस्थपणे परीक्षण करण्याची इच्छा व योग्यता होय? **ग्रीन**

❖ कोणते संशोधन हे मानव वर्तणुकीशी संबंधित असते ? **सामाजिक संशोधन**

❖ संशोधन प्रक्रियेचे पहिली पायरी (स्तर) कोणते ? **समस्या सुत्रण**

❖ समस्या म्हणजे एक प्रश्नवाचक विधान होय - ही व्याख्या कुणाची ? **करलिंगर**

❖ संशोधनाच्या सामान्य विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधक समस्येत रूपांतर करणे म्हणजे काय ? (Formation of problem) **समस्या सूत्रण**

❖ श्री रार्बट ॲकॉफ यांनी समस्या सुत्रानाच्या किती प्रक्रिया सांगितल्या आहे ? **चार**

❖ श्री. रॉबर्ट मर्टन यांनी समस्या सुत्रण प्रक्रियेत किती घटक सांगितले आहे ? **तीन**

❖ प्रारंभिक प्रश्न, प्रश्नांचे युक्तिनिष्ठ समर्थन, विविक्षित प्रश्न हे कशाचे घटक आहेत ? **समस्या सुत्रण प्रक्रिया**

Dr. KAVITA TATED

- ❖ संशोधकाने संशोधन विषयासंबंधी केलेल्या तात्कालिक पूर्वानुभवाला काय म्हणतात ? **गृहितकृत्ये**
- ❖ परीक्षण केल्या जाणाऱ्या विचारांना गृहितकृत्ये असे म्हणतात ही व्याख्या कुणाची ? **एमोरी बोगार्ड**
- ❖ स्पष्टता, विशिष्टता, अनुभवजन्यता, सिद्धान्त निष्ठता हे कशाची वैशिष्ट्ये आहेत ? **गृहीतकृत्ये**
- ❖ गुडे आणि हॉट यांनी गृहितकृत्याची उगमस्थानाचे किती स्त्रोत सांगितले आहे ? **पाच**
- ❖ सैद्धांतिक चौकटीचा अभाव, त्याच्या ज्ञानाचा अभाव, तर्कशुद्ध उपोयग करण्याच्या क्षमतेचा अभाव, सैद्धांतिक पार्श्वभूमीचा अभाव ह्या कशाच्या समस्या आहेत ? **गृहितकृत्य**
- ❖ गुडे आणि हॉट यांनी गृहितकृत्याचे किती प्रकार सांगितले आहे ? **तीन**
- ❖ प्रत्यक्ष वास्तविकतेपासून दूर असलेल्या संकल्पनांना काय म्हणतात ? **आदर्श गृहितकृत्ये**
- ❖ सरळ व मिश्रित गृहीतकृत्ये असे दोन प्रकार कुणी मांडले आहेत ? **श्री.हेज**
- ❖ नकारात्मक गृहीतकृत्याच्या मांडणीला काय म्हणतात ? **अभिन्नत्वदर्शक गृहीतकृत्य**
- ❖ गती, स्मृती व माहितीचे संप्रेशन ही कशाची वैशिष्ट्ये आहेत ? **संगणक**
- ❖ परिवर्तनीय घटनातील संबंध सूचविणारी गृहीतकृत्ये कशी असतात ? **जास्त लवचिक**
- ❖ वर्णनात्मक, संबंधात्मक उपकल्पना कशाचे प्रकार आहे ? **गृहीतकृत्ये**
- ❖ संकल्पना म्हणजे विविध तथ्यांचे स्वरूप प्रतिविधान होत ही व्याख्या कुणाची ? **मॅकले लॅण्ड**
- ❖ एका विवरणात्मक गुण किंवा संबंधाकडे संकेत करणारा शब्दप्रयोग म्हणजे संकल्पना होय ? **मिचेल**
- ❖ तथ्यांची अतिशय मोजक्या शब्दात केलेली परिभाषा म्हणजे काय ? **संकल्पना**
- ❖ संकल्पीकरणाची प्रक्रिया कोणती ? **अमूर्तीकरण व सामान्यीकरण**
- ❖ संकल्पनांचे स्तर कोणते ? **औपचारिक व्याख्या व व्यवहारिक व्याख्या**
- ❖ संशोधन कार्याची योजना आखणे म्हणजे काय ? **संशोधन आराखडा**
- ❖ अचूक निष्कर्ष काढणे, तथ्य संकलन व तथ्यांचा संभाविक समस्येचे पूर्वानुमान आणि चौकशी तंत्राचा निर्माण करण्यासाठी कशाची गरज असते ? **संशोधन आराखडा**
- ❖ नमुना चाचणीसंबंधी आराखडा, संख्याशास्त्रीय आराखडा, कार्यान्विकरणासंबंधी आराखडा, निरीक्षण आराखडा हे कशाचे घटक आहेत ? **व्यवहार्य संशोधन आराखडा**
- ❖ संशोधन समस्येचे कार्यक्षेत्र व कालमर्यादा निश्चित करून उद्देशानुसार तथ्यांची नोंद करणे कोणत्या संशोधन आराखड्याचे घटक आहेत ? **आदर्श संशोधन आराखडा**
- ❖ संशोधक आराखड्याचे किती प्रकार आहेत ? **चार**
- ❖ संबंधीत साहित्याचे अध्ययन, अनुभव सर्वेक्षण, विषयाशी निगडीत घटनांचे विश्लेषण व निष्कर्ष ह्या अटी कशासाठी आहेत ? **अन्वेषणात्मक अध्ययन संशोधन आराखडा**
- ❖ अध्ययन विषयाची निवड, तंत्राची निवड, वस्तुनिष्ठता, संतुलीत दृष्टीकोण, मितव्ययता ह्या अटी कशासाठी आहेत ? **वर्णनात्मक अध्ययन संशोधन आराखडा**
- ❖ संशोधन समस्या म्हणजे निराकरणासाठी समोर आलेला प्रश्न होय ही व्याख्या कुणी केली ? **टाऊनशेड**
- ❖ हॅज यांनी उपकल्पना यांचे दोन उपप्रकार कोणते सांगितले ? **सरल व मिश्रीत गृहीतकृत्ये**
- ❖ तथ्याधिष्ठीत माहितीच्या आधारे केलेले वर्णनात्मक विश्लेषण म्हणजे काय ? **वर्णनात्मक संशोधन**
- ❖ सामाजिक समस्येचे अध्ययनासाठी कोणता आराखडा उपयोगी ठरेल ? **निदानात्मक संशोधन आराखडा**
- ❖ सामाजिक घटनांचे अध्ययनासाठी कोणता आराखडा उपयोग ठरेल ? **वर्णनात्मक संशोधन आराखडा**

Dr. KAVITA TATED

- ❖ निरीक्षण, परीक्षणातून होणाऱ्या सामाजिक घटनांच्या अध्ययनास म्हणतात ? **परीक्षणात्मक संशोधन**
- ❖ प्रयोगोत्तर, परिणामोत्तर, पूर्वोत्तर परीक्षण आराखडा कशाचे उपप्रकार आहे ? **प्रायोगिक गट**
- ❖ जणगनना पद्धती (Census Method) कशाचा प्रकार आहे?. **नमुना निवड पद्धती**
- ❖ नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघुप्रतिनिधी आहे - **गुडे आणि हॉट**
- ❖ संभाव्यता व गैरसंभाव्यता निवड पद्धती कशाचे प्रकार आहे ? **नमुना निवड पद्धती**
- ❖ लॉटरी कार्ड प्रणाली, ग्रीड प्रणाली कशाचे प्रकार आहे ? - **संभाव्यता नमुना निवड पद्धती**
- ❖ संशोधन क्षेत्रावर संख्येचा वापर होत नसेल तर कोणती निवड केली ? **गैरसंभाव्यता नमुना निवड**
- ❖ संख्याशास्त्रीय दृष्टीने समग्रातून एककाला नमुन्यात समाविष्ट केले जाते तो प्रकार? **संभाव्यता नमुना निवड**
- ❖ नियमित आणि अनियमित अंकन पद्धती, कोटा निवड पद्धती कशाचे प्रकार आहेत ? - **संभाव्यता नमुना निवड पद्धती**
- ❖ विशाल क्षेत्रासाठी कोणती नमुना निवड वापरली जाते ? - **बहुस्तरीय/बहुपदीत, वृंद नमुना निवड**
- ❖ उद्देशानुसार, प्रतिनिधीक स्वरूपातील नमुना निवड पद्धतीला म्हणतात ? **सहेतुक नमुना निवड**
- ❖ सोयीस्कर नमुना निवड, स्वयं निर्धारित नमुना निवड, सहेतुक नमुना निवड कशाचे प्रकार आहेत - **गैरसंभाव्यता नमुना निवड**
- ❖ Rules of Sociological Methods हा ग्रंथ कुणी लिहिला ? - **इमील दूरखीम**
- ❖ गृहीतकांची निर्मिती, साधन सामग्रीचे निरीक्षण व संग्रहन, सामग्रीचे वर्गीकरण, सामान्यीकरण व सामाजिक नियमांची निर्मिती हे सामाजिक संशोधनाचे चार स्तर कोणी मांडले **? -पी. व्ही यंग**
- ❖ गृहितकांची निर्मिती, तथ्यांचे निरीक्षण आणि लेखन, तथ्यांचे वर्गीकरण, सामान्थीकरण हे चार प्रकार व दोन स्त्रोत कुणी मांडले **- लूण्डबर्ग**
- ❖ सामान्य संस्कृती, वैज्ञानिक सिद्धान्त, सहाय्यता, व्यक्तिगत अनुभव ही सुत्रे कोणी मांडली? **गुड.आणि हॅट**
- ❖ वैयक्तीक आणि बाह्यस्त्रोत हे दोन गृहीतकृत्याचे स्त्रोत कुणी मांडले **? - लुंडबर्ग**
- ❖ नकारात्मक, सकारात्मक संकल्पनात्मक व सार्वभौमिक गृहीतकृत्य कशाचे उपप्रकार आहेत ? **प्रायोगिक गृहीतकृत्ये**
- ❖ सहसंबंध अभ्यासण्याची सहज सोपी पद्धत कोणती ? **प्रसरण आकृती**
- ❖ Scienticific social survey and Research हा ग्रंथ कुणी लिहीला ? **- पी. व्ही. यंग**
- ❖ अवलोकन आणि मानप करतांना एकमत होणारी संकल्पना म्हणजे तथ्य होय ?- **फेअरचाईल्ड**
- ❖ वास्तविक स्वरूपात घडून आलेली घटना म्हणजे काय ? **- तथ्य**
- ❖ मुंबई दूरदर्शन केंद्रात कार्यरत असणाऱ्या तंत्रज्ञांच्या समस्या या संशोधन विषयातील एक युनिट कोणता ? - **तंत्रज्ञ व्यक्ती**
- ❖ व्यक्त स्वरूपाची कोणतीही क्रिया म्हणजे काय ?- **प्रतिक्रिया**
- ❖ व्यक्त किवा वास्तविक स्वरूपाच्या कोणत्याही क्रियेची नोंद म्हणजे काय ? **- तथ्य**
- ❖ प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, अनुसूची, मूलाखत ही कोणती माध्यमे आहेत ? **- प्राथमिक स्त्रोत**
- ❖ आत्मचरित्रे, रोजनिशी, संस्मरणे पत्रे ही कोणती माध्यमे आहेत. **- द्वितीयक स्त्रोत**
- ❖ प्रकाशित व अप्रकाशित सार्वजनिक प्रलेख, आकडे , वर्तमानपत्रे, संस्थाची प्रकाशने, व्यष्टी वृतांत सार्वजनिक कागदपत्रे ही कोणती माध्यमे आहेत - **द्वितीयक स्त्रोत**

Dr. KAVITA TATED

- ❖ समग्र सर्वेक्षण आणि नमुना सर्वेक्षण हे कशाच्या पद्धती आहे **- प्राथमिक तथ्य संकलन**
- ❖ यापैकी कोणते स्त्रोत हे नेहमी लेखी स्वरूपात मिळतात ? **द्वितीयक स्त्रोत**
- ❖ (Applied Research) उपयोजित संशोधन कुणासाठी उपयोगी आहे - **मानवी कल्याण**
- ❖ कोणत्या स्त्रोतांवर/साधनांवर संशोधकाचे पूर्ण नियंत्रण असते - **प्राथमिक साधन**
- ❖ विशिष्टत्वाकडून सामान्याकडे जाणाऱ्या विधान प्रस्तुती करणाला काय म्हणतात - **आगमन पद्धती**
- ❖ सामान्याकडून विशिष्टाकडे जाणाऱ्या विधान प्रस्तुतीकरणाला काय म्हणतात - **निगमन पद्धती**
- ❖ ऐतिहासिक, समन्वयमूलक, अनुभवात्मक, प्रयोगात्मक पद्धतीचे दुसरे नाव काय - **आगमनपद्धती**
- ❖ प्रयोगात्मक, सांख्यिकीय पद्धती कशाचे उपप्रकार आहे - **आगमनपद्धती**
- ❖ निगमनपद्धतीचा आधार काय असतो ? **तर्क**
- ❖ विश्लेषणात्मक, कल्पनात्मक, अमूर्त पद्धतीचे दूसरे नाव काय ? - **निगमन पद्धती**
- ❖ स्थुल अध्ययनासाठी कोणती पद्धती उपयुक्त आहे - **आगमन पद्धती**
- ❖ सुक्ष्म अध्ययनासाठी कोणती पद्धती उपयुक्त आहे - **निगमन पद्धती**
- ❖ आगमनासाठी निगमन आहे आणि दोन्हीही सत्यन्वेषणासाठी आहे हेच खरे आहे, हे विधान कशाच्या संदर्भात व कुणाचे - **संशोधन पद्धती, ऑगस्ट काम्ते**
- ❖ संशोधन कार्यात कार्यकारण संबंध समजण्यासाठी केलेले व सामुहिक व्यक्तीगत सुक्ष्म अवलोकन म्हणजे काय ? - **निरीक्षण पद्धती**
- ❖ व्यक्तीगत आणि सामुहिक हे कशाचे प्रकार आहेत ? **- निरीक्षण पद्धती**
- ❖ पूर्ण सहभागी, असहभागी व अर्धसहभागी हे कशाचे प्रकार आहेत ? **- नियंत्रित निरीक्षण पद्धती**
- ❖ अध्ययन समुहाचे तटस्थ वृत्तीने निरीक्षण करण्याची पद्धत कोणती ? **- असहभागी निरीक्षण पद्धती**
- ❖ सामाजिक घटनांवर नियंत्रण, निरीक्षक व नियंत्रण हे कशाचे उपप्रकार आहेत ? **नियंत्रित निरीक्षण पद्धती**
- ❖ या निरीक्षणात परिस्थिती व व्यक्ती हे घटक स्वभाविक स्थितीत असतात- **अनियंत्रित निरीक्षण**
- ❖ अनुसुची, दैनंदिनी, यांत्रिक साधने ही या निरीक्षण पद्धतीची साधने आहे - **स्वयंनियंत्रण पद्धती**
- ❖ विविध संशोधकाकडून एकाच समस्येवरील निरीक्षण पद्धतीला काय म्हणतात ? **- सामूहिक निरीक्षण**
- ❖ नर्सरी वर्गातील मूलांचे अभ्यास करण्यासाठी काणती पद्धत वापरता येईल **- निरीक्षण पद्धती**
- ❖ व्यक्तिनिष्ठता, औपचारिकता, कालावधीची मर्यादा, खर्चिकता हे कोणत्या पद्धतीचे दोष आहे ? **- निरीक्षण**
- ❖ तथ्य संकलनातील सर्वात सुलभ, प्राथमिक, लोकप्रिय पद्धत कोणती - **निरीक्षण पद्धती**
- ❖ प्रश्नकर्ता व उत्तरदातांच्या संवादातून मिळणारी माहिती म्हणजे काय - **मुलाखत**
- ❖ मुलाखत ही मुलतः सामाजिक आंतरक्रियेची प्रक्रिया आहे ही व्याख्या कुणाची **- गुडे आणि हॉट**
- ❖ या पद्धतीत दोन किंवा अधिक व्यक्तीमध्ये संवाद आणि मौखिक पद्धतीची प्रश्नोत्तरे होतात **- मुलाखत**
- ❖ मुलाखतीचे वर्गीकरण किती भागात केले जाते ? **- पाच**
- ❖ उद्दिष्ट उत्तरदात्यांची संख्या, अभ्यास पद्धती, विषय साधन हे वर्गीकरण कशाचे आहे ? - **मुलाखत**
- ❖ प्रश्नाचे प्रमाणीकरणातून घेण्यात आलेली मुलाखत कोणती ? - **संरचित मुलाखत**
- ❖ समस्येची मांडणी करून घेण्यात आलेली मुलाखत कोणती? - **असंरचित मुलाखत**
- ❖ विशिष्ट मुद्यावर लक्ष केंद्रित करून प्रश्नकर्त्याने घेतलेली मुलाखत कोणती ? - **केंद्रित मुलाखत**
- ❖ अनुसूचीद्वारे प्रश्नकर्त्याकडून उत्तरदात्याची उत्तरे लिहून घेणारी मुलाखत? - **औपचारिक/नियंत्रित मुलाखत**

Dr. KAVITA TATED

- ❖ कोणत्या मुलाखतीत प्रश्नकर्त्याला प्रश्न विचारण्याबाबत पूर्ण स्वातंत्र असते ? **अनौपचारिक मूलाखत.**
- ❖ पूर्वतयारी, प्रत्यक्ष संचालन, नियंत्रण, समाप्ती व अहवाल या प्रक्रिया कशात केल्या जातात **- मुलाखत**
- ❖ उत्तरदात्याच्या माहितीची वस्तुनिष्ठता व वास्तवता पारखून घेण्याची क्रियेला काय म्हणतात - **प्रमाणिकरण**
- ❖ कुशलता, विनम्रता, नीतिधैर्य , संयम व सावधगिरी, निष्पक्षता हे गुण कशासाठी? - **आदर्श मुलाखतकार**
- ❖ तथ्यांचे व्यापक संकलन, उत्कृष्ट प्रतिसाद, व्यक्तिनिष्ठता, विश्वसनीयता हे कशाचे गुण आहेत- **मुलाखत**
- ❖ कोणत्या तंत्राकरिता प्रशिक्षण आणि पुर्व तयारी गरजेची असते **- मुलाखत**
- ❖ स्मरणशक्ती वर आधारीत व वैयक्तीक पूर्वग्रहाचा प्रभाव असलेले तथ्य संकलन तंत्र कोणते ? **मुलाखत**
- ❖ संशोधन समस्येशी संबंधित प्रश्नांची क्रमबद्ध तालिका म्हणजे काय ? **- प्रश्नावली**
- ❖ लेखी प्रश्न व त्याचे लेखी प्रत्युत्तर म्हणजे प्रश्नावली ही व्याख्या कुणाची **- जोहॅन गॅल्टुंग**
- ❖ मौलिक व्यवहाराचे अवलोकन करण्यासाठी भौतिक स्वरूपात त्यांच्या समोर प्रस्तुत केल्या जाणाऱ्या प्रेरणांच्या समुहाला प्रश्नावली म्हणतात ही व्याख्या कुणाची **- जी ए. लुण्डबर्ग**
- ❖ बंदीस्त, मुक्त, चित्रमय, मिश्रीत हे कोणत्या तथ्य संकलन तंत्राचे प्रकार आहे- **प्रश्नावली**
- ❖ प्रश्नावलीत ज्या प्रश्नांना पर्यायी उत्तरे दिलेली असतात त्या प्रश्नांना काय म्हणतात ? - **बंदिस्त प्रश्न**
- ❖ प्रश्नावलीत प्रश्नांचे विश्लेषणात्मक पद्धतीने उत्तर द्यावे लागते त्यांना काय म्हणतात -**मुक्त प्रश्न**
- ❖ ज्या प्रश्नावलीत मत, अभिवृत्ती, भावना, दृष्टिकोन यांचा अभ्यास केल्या जातो ? - **असंरचित प्रश्नावली**
- ❖ आकार, भाषा निवड, क्रम, कागद, छपाई, रंग हे घटक कोणत्या तथ्यसंकलन तंत्राचे असतात - **प्रश्नावली**
- ❖ संशोधन कार्यात संकलनासाठी योग्य तंत्र कोणते ? **प्रश्नावली**
- ❖ प्रश्नावलीबाबत दिल्या जाणाऱ्या सुचनांना काय म्हणतात ? **- निवेदन**
- ❖ उद्दिष्टपूर्ण तथ्य संकलन, व्यापक क्षेत्राचे अध्ययन, वस्तुनिष्ठ, तथ्य संकलन, गोपनीयता, स्वयंप्रशासित व्यवस्था असलेले तथ्य संकलनाचे तंत्र कोणते ? **- प्रश्नावली**
- ❖ चुकीची किंवा अपूर्ण माहिती, उत्तरदात्यांचे असहकार्य, उत्तरदात्यांच्या मर्यादा तथ्यांच्या प्रमाणतेचे परीक्षण अशक्य असणारे,वस्तुनिष्ठ माहितीची खात्री नसणारे तथ्यसंकलन तंत्र कोणते **?- प्रश्नावली**
- ❖ कोणत्या साधन तंत्रात प्रश्नकर्ता व उत्तरदाता यांच्यात प्रत्यक्ष संपर्क होत नाही **- प्रश्नावली**
- ❖ कोणत्या साधन तंत्रात निरीक्षण तंत्राचा वापर करता येत नाही- **प्रश्नावली**
- ❖ विस्तृत क्षेत्रातून तथ्य संकलनाचे उपयोगी तंत्र कोणते ? **- प्रश्नावली**
- ❖ मुलाखतीमध्ये उत्तरदात्याकडून भरून घेतले जाणारे तथ्य संकलन तंत्र कोणते **- अनुसूची**
- ❖ अनुसुची म्हणजे प्रश्नांची औपचारिक किंवा विशिष्ट विषयाची अनुक्रमानुसार बनविलेली यादी किंवा सुची होय ही व्याख्या कुणाची **- वेबस्टर**
- ❖ वर्गीकरण, लिखित प्रश्नांचे दस्तऐवज आधार, मूल्यमापन, निरीक्षण, मुलाखत, संस्थात्मक सर्वेक्षण हे कोणत्या तथ्यसंकलनाचे तंत्र आहे ? **अनुसूची**
- ❖ प्रश्नांची लेखी सूची म्हणजे काय ? **- अनुसुची**
- ❖ कागद, आकार, समास, रिकामी जागा, मुद्रण, चित्रांचा उपयोग, लांबी घटकांचे सुयोग्य संघठन हे कशाचे भौतिक स्वरूप आहे ?- **अनुसुची**
- ❖ प्रास्ताविक, मुख्य भाग व मुलाखतकारासाठी सूचना हे कोणत्या तंत्राचे घटक आहेत ? **- अनुसूची**
- ❖ कोणत्या तथ्य संकलन तंत्रात उत्तरदात्यांचा प्रतिसाद मोठा असतो - **अनुसुची**

Dr. KAVITA TATED

- ❖ उत्तरदात्यांची निवड, प्रश्नकर्त्याची निवड, प्रशिक्षण, तथ्य संकलन, पूर्नतपासणी, संपादन, संकेतीकरण या प्रक्रिया कोणत्या तंत्रात केल्या जातात - **अनुसूची**
- ❖ गुणात्मक (अमूर्त) तथ्यांना गणनात्मक स्वरूप देण्याच्या पद्धतीला काय म्हणतात ? **- अनुमापन तंत्र**
- ❖ तर्कनिष्ठ प्रामाण्य, पंचांची मान्यता, स्वतंत्र मापदंड हे कशाचे प्रमाणिक तंत्र आहे ? **- अनुमापन तंत्र**
- ❖ गुंतागुंतता, अमूर्तता, सामाजिक घटकांची कमतरता, मानववर्तणूकीची परिवर्तनशीलता, वस्तूनिष्ठतेची समस्या ह्या कोणत्या तंत्रातील अडचणी आहेत **- अनुमापन तंत्र**
- ❖ तथ्य, दृश्य समुह किंवापूर्ण परिणामापूर्वी प्रकट होणाऱ्या क्रियेला मनोवृत्त म्हणतात - **बर्नार्ड**
- ❖ व्यक्तीची सामाजिक घटनेसंबंधीची मनोवृत्तीही त्यांच्या स्थायी प्रतिक्रियांचे प्रतीक आहे- **कॅम्पबेल**
- ❖ एकाद्या घटनेसंबंधी अनुकूल किंवा प्रतिकूल मनोभारना म्हणजे काय ? **- मनोवृत्ती**
- ❖ संवेगात्मक, प्रत्यक्षात्मक, ज्ञानात्मक ही कशाची वैशिष्ट्ये आहेत ? - **मनोवृत्ती**
- ❖ अंकदर्शक, सामाजिक दुरत्वदर्शक, तीव्रता मापक, श्रेणी सुचक हे कशाचे प्रकार आहेत **- अनुमापन मनोवृत्ती**
- ❖ अनुकुल व प्रतिकूल मते कशात मोजली जातात **- अंकदर्शक अनुमापन**
- ❖ सामाजिक दुरत्व मापक अनुमापन कुणी मांडले **- बोगार्डस**
- ❖ सामाजिक दुरात्व आणि परस्परसंबंध यांचे मापन कशात होते.?- **समाजमिती अनुमाप**
- ❖ सामान्य स्वरूपात तसेच आलेखाद्वारे एखाद्या विशिष्ट प्रसंगी एखाद्या समुहातील सभासदांच्या पारंपारिक संबंधांना प्रकट करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?- **समाजमिती (जेनिंग्ज)**
- ❖ समुहातील आकर्षणे व विकर्षणे समजून घेण्याचा प्रकार कोणता **? समाजमिती**
- ❖ आलेखात्मक पद्धतीने निष्कर्ष कोणत्या तंत्रात प्रस्तुत केले जातात - **समाजमिती परिक्षण**
- ❖ प्रामाण्य, व्यवहारिकता, विश्वसनीयता, सरलता, व्यापकता, प्रमाणांवर आधारित, उचित भार, वस्तूनिष्ठ तथ्य ही कशाची वैशिष्ट्ये आहे - **समाजमिती अनुमापन तंत्र**
- ❖ तुलनात्मक युग्नमांच्या सारणीची ( Matrix) पद्धत कुणी शोधली? - **गिलफोर्ड**
- ❖ कोणत्या तंत्रामध्ये टक्केवारीवरून अक्रमांकाच्या अनुमापन करण्यात आले ? **- हारोविज तंत्र**
- ❖ अत्यंत टोकाचे ते सौम्य विधान (अभावात्मक ते भावात्मक) करून प्रतिक्रिया जाणून घेण्याचे तंत्र कोणते ?- **मतमापक अनुमापक**
- ❖ विसंगतीचे वैषयिक माप कुणी शोधून काढले - **थर्स्टटन**
- ❖ उत्तरदात्यांच्या उत्तरांच्या आधारे मनोवृत्तीच्या मापनाचा शोध कोणत्या तंत्रात घेतल्या जातो - **थर्स्टटन**
- ❖ मनोवृत्ती प्रकट करण्यासाठी मिळालेल्या अंकाचा Critical Ratio काढण्याच्या पद्धतीला काय म्हणतात **?- लीकर्ट अनुमापन तंत्र**
- ❖ कोणत्या पद्धतीत एकूण अंकाचे प्रतिशतमध्ये रूपांतर करून थॉनडाईक सारणीच्या आधारे प्रत्येक प्रतिशताचे सिग्मा मूल्य काढले जाते ? **- सिग्मा अनुमापन तंत्र**
- ❖ समाजिक स्थितीचे अनुमापन तंत्र कुणी शोधून काढले **?- चॅपीन**
- ❖ संख्यात्मक अनुमापन तंत्रात बिंदु रेखीय पद्धती कुणी अंमलात आणली ? **- मोरेनो**
- ❖ सामाजिक स्थितीच्या अनुमापन तंत्रात वैज्ञानिक भार प्रदान करण्याचा प्रयत्न कुणी केली - **गटमेन**
- ❖ सामाजिक संशोधन पद्धतीतील अभ्यास प्रक्रियेचे विश्वासनीय साधन कोणते ?- **आशय विश्लेषण**

Dr.KAVITA TATED

- ❖ संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ आणि संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे ही व्याख्या कुणाची **- बी. बेरेलसन**
- ❖ या तंत्रात प्रचार प्रसार माध्यमातून प्रकट होणाऱ्या लिखित व मौखिक तथ्यांचे विश्लेषण होते ?- **आशय विश्लेषण तंत्र**
- ❖ या तंत्रात निष्कर्षाची सत्यता तपासता येते व त्याचे पुनर्परीक्षण सुद्धा करता येते ? - **आशय विश्लेषण तंत्र**
- ❖ शब्द, वाक्य, पात्रे, एखाद भाग, स्थान आणि वेळ हे कशाचे एकक आहेत - **आशय विश्लेषण तंत्र**
- ❖ या तंत्रात सामाजिक घटनांशी संबंधित गुणात्मक तथ्य सामग्रीचे वैज्ञानिक तथ्यात रूपांतर होते- **आशय विश्लेषण तंत्र**
- ❖ आशय विश्लेषण तंत्राचा प्रारंभ कुणी केला ?- **श्री हॅराल्ड लॉस्वेल (१९३७)**
- ❖ प्रसारसाधनांच्या (मनोरंजनाच्या) प्रभावाचे मूल्यमापन करण्याचे शास्त्रीय तंत्र?- **आशय विश्लेषण तंत्र**
- ❖ व्यक्तीमध्ये असणाऱ्या सुप्त गुणांचे किंवा प्रकृतीचे प्रकटीकरण होणे म्हणजे काय ? - **प्रक्षेपण**
- ❖ अहम आणि रक्षणात्मक प्रक्रिया प्रक्षेपण तंत्राचे मुख्य आधार कुणी मानले आहे ?- **फॉईड**
- ❖ व्यक्तीचा अहम ज्या तत्वांचा किंवा घटकांचा स्वीकार करीत नाही अशी 'स्व' संबंधीत तत्त्वे बाह्य जगनावर आरोपित करण्याच्या प्रक्रियेला प्रक्षेपण म्हणतात ही व्याख्या कुणाची? - **ब्राऊन**
- ❖ अंतरंगाचे अध्ययन, मनोवैज्ञानिक अध्ययन, संशोधनाचा प्रभाव ही या तंत्राची वैशिष्ट्ये आहे ?- **प्रक्षेपणतंत्र**
- ❖ शाईच्या ठिपक्यापासून केल्या जाणाऱ्या प्रक्षेपण तंत्र चाचणीला काय म्हणतात - **रोर्शीक चाचणी**
- ❖ शब्द उच्चारणाच्या प्रतिक्रियेतून येणाऱ्या प्रक्षेपण चाचणीला काय म्हणतात ? - **शब्द साहचर्य चाचणी**
- ❖ छायाचित्र मालिका दाखवून कथानक लिहण्याबद्दल सूचना करणारी चाचणी ?- **प्रासंगिक अर्धबोध चाचणी**
- ❖ २५ प्लेटसवर प्रत्येकी ३ चित्रे काढून त्यांचा क्रम लावणाऱ्या चाचणी? - **टॉमिकिन्स हॉर्न चित्ररचना**
- ❖ संदिग्ध प्रश्न विचारून आलेल्या प्रतिक्रियेचे परिक्षण करणाऱ्या चाचणीला काय म्हणतात?- **प्रक्षेपी प्रश्न तंत्रे**
- ❖ वांशिक गटाबाबत अभिवृत्तीचे अध्ययन करण्यासाठी ही चाचणी वापरली जाते ?- **रोझेंझविग चाचणी**
- ❖ व्यष्टी अध्ययन पद्धती (Case study Method) चे मूलतत्व काय? - **सर्वांगीणता**
- ❖ व्यष्टी अध्ययन पद्धतीचा सर्वप्रथम प्रयोग कुणी केला? **- हर्बट स्पेनसर**
- ❖ व्यष्टी अध्ययन पद्धती संशोधन कार्यात कुणी अंमलात आणली ?- **फ्रडेरीक लिप्ले**
- ❖ सामाजिक एककाचे (Unit) एकात्म स्वरूप पूर्णपणे करण्याच्या दृष्टीने सामाजिक तथ्यांचे संकलन करण्याच्या पद्धतीला व्यष्टी अध्ययन पद्धती म्हणतात ही व्याख्या कुणाची**- गुडे आणि हॉट**
- ❖ एककाचे सखोल व सुक्ष्म अध्ययन, गुणात्मक अध्ययन कशामध्ये होतो ? **- व्यष्टी अध्ययन पद्धती**
- ❖ मानवी स्वभावातील मूलभूत समानता, काल तत्वांचा प्रभाव, घटनांची जटिलता, परिस्थितीचे अध्ययन, सामाजिक सहसंबंध ही कशाची आधारतत्त्वे आहेत? **- व्यष्टी अध्ययन पद्धती**
- ❖ व्यक्तीनिष्ठ अध्ययन व समुहनिष्ठ अध्ययन हे कशाचे प्रकार आहेत ? **- व्यष्टी अध्ययन पद्धती**
- ❖ संशोधन समस्येचे स्पष्टीकरण,घटनांचा क्रम, घटनांची कारणे, विश्लेषण आणि निष्कर्ष, अहवाल लेखन, हे या घटकांची प्रक्रिया आहे ? **- व्यष्टी अध्ययन प्रक्रिया**
- ❖ शमीरपेठ मधील ग्रामीण समाजातील परिवर्तनाचा सामाजिक अभ्यास कशाचे उदाहरण आहे.**- व्यष्टी अध्ययन पद्धती**

Dr. KAVITA TATED

- कोणत्या अध्ययन पद्धती मध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोत वापरली जातात- **व्यष्टी अध्ययन पद्धती**
- संशोधनाची रचनात्मक बाजू म्हणजे तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन होय ही भूमिका - **श्रीमती यंग**
- निरीक्षण प्रश्नावली, मुलाखत मधून प्राप्त तथ्यांना काय म्हणतात ?- **प्राथमिक तथ्य**
- वैयक्तीक व सार्वजनिक कागदपत्रातून प्राप्त तथ्यांना काय म्हणतात ?- **डॉ. द्वैतियीक तथ्य**
- संकलीत तथ्यांचे संपादन कोणत्या प्रक्रियेत केले जाते ?- **तथ्य सारणीयन प्रक्रिया**
- मुळ संकलीत तथ्यांचे प्रतिकांमध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात - **तथ्यांचे सांकेतिकीकरण**
- तथ्यांचे निर्वचन सुलभतेने करण्यासाठी तथ्यांच्या गट पाडण्याच्या विधीला म्हणतात ?- **वर्गीकरण**
- परिणात्मक व गुणात्मक हे कोणत्या पद्धतीचे प्रकार आहे ?- **वर्गीकरण**
- प्राप्त तथ्यांचे संक्षिप्त स्वरूपात दुसऱ्या प्रारूपात रूपांतरण करण्यास काय म्हणतात ?- **तथ्यांचे स्थानांतरण**
- सूचीयन, कार्ड निवड व मापन पद्धती, पट्टी पद्धती, पंचकार्ड पद्धती कशाचे प्रकार आहेत ?**तथ्य स्थानांतरण**
- पंक्ती किंवा रकान्याचा उपयोग करून तथ्यांच्या क्रमबद्ध समुहांना प्रस्तुत करण्याची क्रिया म्हणजे सांख्यकीय सारणी होय ही व्याख्या कुणाची - **निस्बॅगर**
- सामाजिक संशोधनात वारंवारता व प्रतिक्रिया तालिका कशासाठी वापरतात ?- **सारणीयन**
- तथ्यांचे वर्गीकरण, संकेतन, मोजमाप करणे म्हणजे काय ?- **सारणीयन**
- यांत्रीक, हस्त आणि आलेखात्मक सादरीकरण कशात केले जाते ? - **सारणी तक्ता / सारणीयन**
- शीर्षक, स्तंभ, अनुशीर्षक व अनुलेख, रांगा, रकान्याचा क्रम व टीपा यांचा वापर कुठे होतो?- **सारणीयन**
- साधी व द्विगुणीय, बहुगुणीय, सामान्य उद्देशीय, विशिष्ट उद्देशीय, आवृत्ती व संचयी आवृत्ती हे कोणत्या संशोधन स्तराचे प्रकार आहेत ?- **सारणीयन**
- अध्ययनाची तथ्ये व अध्ययनाचे निष्कर्ष हे निर्वचन होय ही व्याख्या कुणाची - **जहादा आणि कुक**
- तर्कनिष्ठ आणि सांख्किीय पद्धत कशाचे प्रकार आहे ? **सामान्यीकरण**
- प्रस्तावना, संशोधन समस्या, अध्ययन उद्देश, अध्ययनक्षेत्र, संशोधन प्रणाली,नमुना निवड, संशोधनकार्य संघटन, विश्लेषण, उद्दिष्टांचे मूल्यमापन, गृहितकृत्यांची चाचणी, निष्कर्ष,सूचना व उपाययोजना, संदर्भसूची , परिशिष्ट, हे कशाचे घटक आहेत.**- संशोधन अहवाल (Research Report)**
- कोणत्या विषयाला सम्राटाचे विज्ञान किंवा राज्यतंत्राचे विज्ञान म्हणतात - **सांख्यिकी Statistics**
- मानवी कल्याणाचे अंकगणित कोणते ?- **सांख्यकी Statistics**
- नैसर्गिक आणि सामाजिक विषयाच्या मोजमापनांना काय म्हणतात ?- **समंक**
- मोठ्या संख्येने किंवा जटील सामग्रीचे एकंदर सार म्हणजे काय ?- **माध्य (Avereuge)**
- समांतर माध्यचा सामान्य अर्थ काय ?- **सरासरी**
- उपलब्ध असणाऱ्या आकडेवारीची सरासरी काढणे म्हणजे काय ?- - **समांतर माध्य**
- पदमालेचे दोन समान भाग पाडणाऱ्या त्या पदाच्या मूल्यांकनास म्हणतात ?- **मध्यका ( Median)**
- कोणत्या मालेतील सर्व पदांची मांडणी चढत्या किंवा उतरत्या क्रमाने करावी लागते - **मध्यका (Median)**
- ज्या पदाची मालेत सर्वात जास्तवेळा पूनरावृत्ती होते त्या पदाच्या मूल्याला काय म्हणतात ?- **भूयिष्टक/बहुलक (Mode)**
- कोणत्या घटकामध्ये पदापेक्षा वारंवारीतेला अधिक महत्त्व असते **- बहुलक (Mode)**

Dr. KAVITA TATED

- माध्य, मध्यका आणि भूयिष्टक ही काय आहेत ?- **प्रथम श्रेणीची माध्ये.**
- प्रत्येक पदाचे विश्लेषण करण्यासाठी कशाची गरज असते - **द्वितीय श्रेणीची माध्ये.**
- विविध पदांच्या मूल्यात पडणाऱ्या तफावतीच्या विस्ताराच्या मापाला काय म्हणतात - **अपकिरण**
- माध्य आणि पदांच्या मूल्यात असलेल्या निरपक्ष आणि सापेक्ष अंतराला काय म्हणतात - **अपकिरण**
- सीमा व विचलन माध्य पद्धती कशाची मापे आहेत - **अपकिरण**
- पदमालेतील पदांच्या सर्वात मोठ्या व सर्वात लहान मूल्यांतील अंतराला काय म्हणतात ?- **विस्तार**
- समांतर माध्य, मध्यमा किंवा भूयिष्टक यापैकी कोणत्यातरी माध्यापासून काढलेल्या विविध पदांच्या मूल्यांच्या अंतराच्या बेरजेला पदांच्या संख्येने भाग देवून आलेली संख्या कोणती ?- **माध्य विचलन**
- माध्य विचलनाचे दुसरे नाव काय - **प्रथम अपकिरण घात**
- माध्य विचलनाला माध्याने भाग दिल्यानंतर येणारी संख्या कोणती ?- **माध्य विचलन गुणक**
- माध्य विचलनाचे सापेक्ष माप म्हणजे काय ?- **माध्य विचरक गुणक (Relative Measures)**
- प्रमाण विचलनाचे सूत्र कोणते ? ($Ed^2/2$)
- माध्यापासून काढलेल्या विचलनाच्या वर्गाच्या बेरजेला पदांच्या संख्येने भागून आलेल्या संख्येच्या वर्गमूळाला काय म्हणतात ?- **प्रमाण विचलन (Standard Deviation)**
- सामाजिक संशोधनात सहसंबंध गुणक पद्धती कुणी उपयोगात आणली - **कार्ल पिअरसन**
- सहसंबंध गुणकांचा संभाव्य विभ्रम निश्चित करण्याचे सूत्र कुणी मांडले - **कार्ल पिअरसन**
- कारण आणि प्रभाव यात असणाऱ्या अवधीला काय म्हणतात ?- **विलंबता (Log)**
- दोन चलातील सहसंबंध निश्चित करण्यासाठी नवीन पदमाला तयार करण्यास काय म्हणतात**?- विलंबना व अग्रगमन (Log and Lead)**
- सांख्यिकीमध्ये प्रतीपगमन शब्दाचा उपयोग कुणी केला. - **सरफ्रान्सीस गाल्टन**
- सामाजिक संशोधनात नियंत्रित उपकरण म्हणून कशाचा उपयोग होतो ?- **प्रतीपगमन (Regression)**
- दोन किंवा अधिक चलांमध्ये असणाऱ्या सरासरी संबंधाच्या परिणामाची कल्पना कशातून येते ?- **सहसंबंध**
- दोन किंवा अधिक चलांमध्ये असणाऱ्या परस्पर सरासरी संबंधाच्या प्रवृत्तीची कल्पना येते- **प्रतिपगमन**
- दोन चलांमधील कारण परिणाम संबंधाची कल्पना स्पष्टपणे कशातून मिळते ?- **प्रतीपगमन**
- तथ्यांची दृश्य स्वरूपात मांडणी करण्यासाठी कशाचा वापर होतो ?- **रेखाचित्रीय व आलेख प्रस्तुतीकरण**
- महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांच्या एका विषयाच्या गुणासाठी कोणते चित्र वापरले जाईल - रेखाचित्र
- लोकसंख्यात्मक माहती दर्शविण्यासाठी कशाचा वापर होतो ?- **साधी दण्डाकृती ( Bar Diagram)**
- तथ्य सामग्रीतील अनेक घटकांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी दंडाकृतीचा वापर होतो ?- **गुणक दंडाकृती**
- भारतातील जन्मदर व मृत्युदर दर्शविण्यासाठी कोणते साधन वापरले जाईल **?- गणित दंडाकृती**
- विद्यार्थ्यांच्या विविध विषयावरील गुणांचे सादरीकरण कोणत्या दंडाकृतीने होईल - प्रतिशत दंडाकृती
- धनात्मक व ऋणात्मक विचलन मूल्य दाखविण्यासाठी ही दंडाकृती वापरली जाते ?- **विचलन दंडाकृती**
- द्विमुख दंडाकृतीमध्ये किती घटक दाखविले जातात - **दोन**
- लोकसंख्या संबंधीत तथ्यांसाठी कोणते दंडाकृती वापरली जाते - **स्तूप सोपान दंडाकृती Pyramird**
- तथ्यांचे दोन वैशिष्ट्य दर्शविण्याकरिता कोणती दंडाकृती वापरतात - **द्विदिशा दंडाकृती**

Dr. KAVITA TAED

- ❖ तथ्यांचे तीन वैशिष्ट्य एकत्रित प्रस्तुत करणारी दंडाकृती कोणती ?- **त्रिदंडाकृती ( Triple Bar)**
- ❖ चारपेक्षा जास्त तथ्य असेल तर कोणती वर्तुळाकृती वापरली जाते - **विभाजीत वर्तुळाकृती**
- ❖ चित्रलेख हे प्रस्तुतीकरण कुणी शोधून काढले - **ऑटो न्यूरान**
- ❖ आलेख कागदावरील वरून खाली असलेल्या रेषाला काय म्हणतात ?- **Y axis (Y अक्ष)**
- ❖ आलेख कागदावरील डावीकडून उजवीकडे असलेल्या रेषेला काय म्हणताय़- **x axis (x अक्ष)**
- ❖ आलेखाचा मुळ बिंदु ( Point of origin) कोणता - **शून्य**
- ❖ कालकोणी व वारंवारता वितरण हे कशाचे प्रकार आहे ?- **आलेख ( Graphs)**
- ❖ ज्या आलेखात दोन चलांचे प्रस्तुतीकरण होते तेव्हा त्यांला काय म्हणतात - **द्विचल कालश्रेणी आलेख**
- ❖ चलामधील चढ उताराचा अभ्यास कोणत्या आलेखातून होतो ?- **विस्तार आलेख**
- ❖ सांख्यिकी क्षेत्रात कोणत्या आलेखाचा उपयोग होतो ?- **वारंवारता वितरण आलेख**
- ❖ लॉटरी पद्धती हा नमुना निवड कोणत्या प्रकारचा आहे. -**साधा यादृच्छिक नमुना**
- ❖ उद्दिष्टांशी निगडीत विधान काय आहे ? - **गृहितके**
- ❖ तात्कालीक समस्यांचा निदान करणारे संशोधन कार्य कोणते ? **क्रियात्मक**
- ❖ प्रयोगात्मक संशोधनात कशाची गरज नसते **? विषय विश्लेषण**
- ❖ प्रश्नांना सांकेतांक देण्याच्या पद्धतीला काय म्हणतात ? **कोडींग की**
- ❖ तथ्यांना श्रेणीबद्ध करण्याची तांत्रिक पद्धत कोणती ? **सारणीकरण**
- ❖ सर्व प्रकारच्या उत्तरदात्यांसाठी उपयोगी तथ्य संकलनाचे तंत्र कोणते ? - **अनुसुची**
- ❖ डीजीटल अनेलॉक व हायब्रिड हे कशाचे प्रकार आहे ? **संगणक**
- ❖ संगणकातील माहितीचे सर्वात लहान साधन म्हणजे काय ? **बीट**
- ❖ सामाजिक शास्त्रासाठी सांख्यिकीय पॅकेज म्हणजे काय ? **एसपीएसएस**
- ❖ आपण कशाद्वारे पाय आलेख काढू शकतो ? **एक्सल आणि पॉवरपाईंट**
- ❖ पुढीलपैकी कोणता प्रलेखिय स्त्रोत आहे ? **आत्मचरित्र**
- ❖ कोणत्या पद्धतीत नमुना निवड क्रमाक्रमाने वाढत जाते ? **स्नोबॉल निवड**
- ❖ समग्राचे प्रतिरूप ठरवून नमुना निवड कोणत्या पद्धतीत होते ?- **कोटा नमुना**
- ❖ आदर्श, मूल्य, संबंध, अनुभविक, प्रकार्य हे कशाचे प्रकार आहेत ? **संकल्पना**
- ❖ जनगनना आलेखावरून तयार अहवालाला संशोधन म्हणता येईल काय? **नाही**
- ❖ संशोधन लेख कशावर आधारीत असावा ? **प्राथमिक व दुय्यम साधन**
- ❖ अन्वेषण, वर्णन, निदान, प्रयोग कशाची उद्दिष्टे आहेत - **संशोधन आराखडा**
- ❖ कोणत्या तथ्य संकलनात सांख्यिकीय विश्लेषण शक्य होते ?- **अनुसुची**
- ❖ स्वयंचलित संचय, गती, नेमकेपणा कशाची वैशिष्ट्ये आहेत?- **संगणक**
- ❖ संपूर्ण श्रेणीचे प्रतिनिधीत्व करणारे केंद्रीय मुल्य कोणते- **माध्य**

**डॉ.प्रा. कविता तातेड**
**इतिहास विभाग**
**आचार्य पदवी संशोधन केंद्र,**

**प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे**
**केंद्रप्रमुख,**
**आचार्य पदवी संशोधन केंद्र**

Dr. KAVITA TATED